लोकमत

# राजे उमाजी नाईक यांना अभिवादन

कोल्हापूर : आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात बुधवारी साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, आदी उपस्थित होते.

पुढारी



# शिवाजी विद्यापीठातील नॅनो सायन्सच्या विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागामध्ये बी.एस्सी, एम.एस्सी, नॅनो सायन्स अँड. टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांची भाभा अणुसंशोधन केंद्र मुंबई व सेराफ्लक्स इंड़िया प्रा. लि. या दोन ठिकाणी प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. यामध्ये विशाल भांदिगरे (रा. पुंगाव, कोल्हापूर) आणि अनुषा अगसिबागिल (कोल्हापूर) यांची भाभा अणुसंशोधन केंद्र मुंबई येथे. तसेच तेजश्री जाधव (रा.आंधळी, सांगली) आणि आकांक्षा करंबळी (रा. मिरज) यांची फौंड्री उद्योगातील सराफ्लक्स इंडिया प्रा. लि. कोल्हापूर येथे निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात उमाजी नाईक यांची जयंती

कोल्हापूर : आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या डॉ. ज्योती जाधव, डॉ. विश्वास बापट, डॉ. सुष्मा पाटील, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव यांच्यासह शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# नॅनोसायन्स विभागातील विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील बी.एस्सी, एम.एस्सी. नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विशाल भांदिगरे आणि अनुषा अगसिबागिल यांची भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई येथे एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे.

तेजश्री जाधव आणि आकांक्षा करंबळी यांची सेराफ्लक्स इंडिया प्रा. लि. व स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभाग यांच्या सहयोगी शोध प्रकल्पांतर्गत एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

सकाळ



कोल्हापूर : ॲड.उपाध्ये यांच्या मातोश्री यांचा सत्कार डॉ.जे.एफ पाटील यांनी केला. यावेळी सुरेश जैन, संजय शेटे, विजय ककडे, सुरेश रोटे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# महावीर अध्यासनाला ॲड. उपाध्ये यांची देणगी

कोल्हापूर : ॲड. अशोक तेजपाल उपाध्ये यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी दहा हजारांची देणगी दिली. त्यांच्या मातोश्री अनुसया यांच्या शताब्दी पूर्ततेच्या निमित्ताने त्यांनी अध्यासनाचे डॉ. विजय ककडे यांच्याकडे रक्कम दिली. ॲड. उपाध्ये यांच्या कुटुंबीयांचा भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वाचा सहभाग होता. या त्यांच्या कार्याबद्दल भगवान महावीर अध्यासनातर्फे शाल, श्रीफळ व ग्रंथ देऊन त्यांच्या मातोश्रींचा विशेष सत्कार झाला. या वेळी भगवान महावीर अध्यासन सल्लागार समितीचे सदस्य उपस्थित होते. भगवान महावीर अध्यासन निधी संकलन अध्यक्ष व अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, भगवान महावीर अध्यासनास १ लाखाची देणगी देणारे एन. एन. पाटील व त्यांच्या पत्नी, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, दिगंबर जैन बोर्डिंगचे सुरेश रोटे, अनिल पाटील, प्रा. संदीप पाटील, उद्योजक सुरेश जैन, ॲड. किरण महाजन उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना उपस्थित मान्यवर.

# राजे उमाजी नाईक यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात झाली. मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या डॉ. ज्योती जाधव, डॉ. विश्वास बापट, डॉ. सुषमा पाटील, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव उपस्थित होते.

सकाळ

# नॅनोसायन्सच्या विद्यार्थ्यांची निवड



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांची भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई आणि सेराफ्लक्स इंडिया येथे प्रशिक्षणासाठी निवड झाली. बी.एस्सी.-एम.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (५ वर्षांचा एकात्मिक) अभ्यासक्रमाचे हे विद्यार्थी, विद्यार्थिनी आहेत. विशाल पांडुरंग भांदिगरे (पुंगाव, कोल्हापूर) आणि अनुषा सुरेश अगसिबागिल (कोल्हापूर) यांची संशोधन आणि विकासासाठी अग्रेसर असणाऱ्या भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई येथे वर्षाच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली. तेजश्री राजेंद्र जाधव (आंधळी, सांगली) आणि आकांक्षा अमरनाथ करंबळी (मिरज, सांगली) यांची फाउंड्री उद्योगातील नामवंत सेराफ्लक्स इंडिया, कोल्हापूर व स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभाग यांच्या सहयोगी शोध प्रकल्पांतर्गत एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिविभागाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा व सर्व शिक्षकांनी, सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

तरूण भारत

# नॅनोसायन्सच्या विद्यार्थ्यांची भाभा अनुसंशोधन केंद्रात प्रशिक्षणासाठी निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजीमधील बी. एस्सी., एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांची मुंबई येथील भाभा अनुसंशोधन केंद्रात प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. विशाल भांदिगरे (रा. पुगाव, कोल्हापूर), अनुषा अगसिबागिल (कोल्हापूर) यांची निवड झाली आहे. तेजश्री जाधव (रा. आंधळगाव, सांगली), आकांक्षा करंबळी (रा. मिरज) यांची फाउंड्री उद्योगातील सेराफ्लक्स इंडिया प्रा. लि. कोल्हापूर व स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभाग यांच्या सहयोगी शोध प्रकल्पांतर्गत प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. किरणकुमार शर्मा व शिक्षकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

तरुण भारत

# विद्यापीठात राजे उमाजी नाईक यांना अभिवादन

**कोल्हापूर :** आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी केली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, जैवतंत्रज्ञान अधिविभागाच्या डॉ. ज्योती जाधव, डॉ. विश्वास बापट, डॉ. सुषमा पाटील, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# दूरशिक्षणच्या अभ्यासक्रमांना युजीसीची पाच वर्षासाठी मान्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राकडील विविध अभ्यासक्रमांना नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) यांच्याकडून सलग पाच वर्षासाठी (सन २०२२ ते २०२७) मान्यता प्राप्त झाली आहे, अशी माहिती कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली.

कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, युजीसीकडून मान्यता मिळालेल्या अभ्यासक्रमांमध्ये बी.ए., बी. कॉम., एम.ए., भाषा (इंग्रजी, हिंदी, मराठी), एम.ए. सामाजिकशास्त्र (इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र) एम. कॉम. एम.एस्सी. (गणित) या पदवी व पदव्युत्तर विषयांचा समावेश आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठीची प्रवेश प्रक्रिया सध्या सुरु झाली आहे. ही प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन असून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ८६ अभ्यास केंद्रामध्ये विद्यार्थी, गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी,



कामगार व बंदीजन आदी शिक्षणापासून वंचित घटकांना प्रवेश घेता येणार आहे. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education या लिंकवर प्रवेशाबाबतची माहिती उपलब्ध असून http://sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/ या ऑनलाईन लिंकवर प्रवेश घ्यावा. युजीसीच्या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांना एकाच वेळी नियमित व दूरशिक्षण पद्धतीने पदवी व पदव्युत्तरचे शिक्षण घेता येणार आहे. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घेवून एकाचवेळी दोन विषयांची पदवी प्राप्त करावी, असे आवाहन कुलगुरु डॉ. शिर्के यांनी केले.